# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in


**कालमर्यादित :**
**दि.३०.०७.२०१९.**

जा.क्र.तंशिविकापु/विवि/गांधी जयंती/२०१९/ 2923
दिनांक : 16 JUL 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या **सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित** / बिना अनुदानित
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी सस्था.
(पुणे विभागे)

**विषय :- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त, माहे जुलै, २०१९ मध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा दिनदर्शिकेसह अहवाल सादर करण्याबाबत.**

संदर्भ :- १. शासन परिपत्रक उ.व.तं.शि.विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र./४३/समन्वय, दि.१४/०९/२०१८
२. मा. संचालक, तं.शि.सं.म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्र : १६/गांधी जयंती/२०१८/५६१, दि.१७/०९/२०१८.
३. दिनांक २०/०६/२०१९ रोजी,, मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेली बैठक.

उपरोक्त विषयाच्या संदर्भ क्रमांक १ व २ च्या परिपत्रकातील एकूण १४ मुद्यांच्या अअनुषंगाने, तयार केलेल्या कृति आराखडयानुसार, राष्ट्रपिता महात्मा गांधी याच्या १५० व्या जयंतीनिमित्त आपल्या संस्थेत आयोजित केलेल्या कार्यक्रमाबाबतचा नियतकालिक अहवाल प्रत्येक महि-न्याच्या २५ तारखेपर्यंत या विभागीय कार्यालयास सादर करण्याविषयी यापूर्वी कळविण्यांत आलेले आहे. **परंतु ब-याच शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांनी याविषयाची माहिती अद्यापि सादर केलेली नाही. सबब दिनांक २०.०६.२०१९ रोजी, मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालय मुंबई येथे झालेल्या बैठकीत याबाबत नोंद घेण्यात आलेली आहे.**

तरी या परिपत्रकाव्दारे आपणांस सूचित करण्यात येते की, आपल्या संस्थेची वरील विषयाची माहिती सादर करावयाची असल्याने, या कार्यक्रमाबाबत तयार केलेल्या कृति आराखडयानुसार, माहे जुर्ल, २०१९ मध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमाबाबतचा **दृश्य स्वरुपातील** अहवाल **फोटो / व्हिडिओसह** ऑनलाईन पध्दतीने **www.ropune.org.in या वेबसाईटवर इंन्स्टिटयूट लॉगीन (Institute Login) मध्ये दि. ३०.०७.२०१९ रोजी, दुपारी ०३.०० वाजेपर्यंत भरण्यात यावी.** जेणेकरुन सदरचा एकत्रित अहवाल तंत्रशिक्षण संचालनालयास सादर करणे या कार्यालयास शक्य होईल.

(चं.तु.कुंभार)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.